महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


**महत्वाचे / तात्काळ** जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०२२/ 1703

दिनांक 2 5 MAY 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था
**औरंगाबाद विभाग**

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता एनएसपी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या एआयसीटीई शिष्यवृत्ती योजनांची एआयसीटीई पोर्टलवर जाहीर केलेल्या लाभार्थ्यांच्या गुणवत्ता यादीबाबत.

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र. जा. क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य / विकाप /२०२१-२२ / ४२७ दि. १३.१०.२०२१.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र. जा. क्र. १८/तंशिसं/डीबीटी / विकाप /२०२१-२२/ १८ दि. ०३.०२.२०२२.
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र. जा. क्र. १८/तंशिसं/डीबीटी / विकाप /२०२१-२२/ ४६ दि. ०३.०२.२०२२.
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र. जा. क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य / विकाप /२०२२/ १२३ दि. २०.०५.२०२२.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ( AICTE ) यांच्या खालील प्रगती व सक्षम (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून) तसेच अनाथ (शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ पासून) शिष्यवृत्ती योजनांची महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरीता तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर योजना या National Scholarship Portal (NSP) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ : www.scholarships.gov.in ) राबविण्यात येतात व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येतो व विद्यार्थ्याची यादी संस्थांच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध करून देण्यात येते. प्रत्येक वर्षी एनएसपी पोर्टलवर जवळपास ऑगस्ट मध्ये विद्यार्थ्यांकडून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होते व संस्थांमार्फत अर्ज तपासणीची अंतिम मुदत जवळपास जानेवारी पर्यंत असते.

उपरोक्त संदर्भीय १,२,३ पत्रान्वये विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या ( MahaDBT Portal ) पोर्टलवरील योजनांपैकी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची सर्व संस्थांना योग्य ती दक्षता घेण्याच्या सुचना या विभागाच्या अधिनस्त संस्थांना देण्यात आल्या आहेत.

तरी या बाबत कळविण्यात येते की, AICTE च्या खालील योजनांच्या लाभासाठी मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांची योजना व वर्षनिहाय गुणवत्ता यादी AICTE चे संकेतस्थळ ( www.aicte-india.org-->schemes-->Students-development-schemes ) वर संबंधित योजनांतर्गत जाहीर करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Name of Scheme |
|---|---|
| 1 | PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DEGREE ) |
| 2 | PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DIPLOMA) |
| 3 | SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENTS ( TECHNICAL DEGREE ) |
| 4 | SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENTS ( TECHNICAL DIPLOMA) |
| 5 | AICTE-SWANATH SCHOLARSHIP SCHEME ( TECHNICAL DIPLOMA) |
| 6 | AICTE-SWANATH SCHOLARSHIP SCHEME ( TECHNICAL DEGREE ) |

तरी या विभागाच्या अधिनस्त सर्व संस्थांना खालील तपशीलाप्रमाने पुन:श्च सूचित करण्यात येते की,

१. शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज मंजूर करतेवेळी, विद्यार्थी कोणत्याही एकाच शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची योग्य ती दक्षता स्वत: संस्था प्रमुखांनी घ्यावी.

२. संस्थांनी महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलवर अर्ज मंजूर करतेवेळी, एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेली शिष्यवृत्ती योजनाचे लाभार्थी आहे किंवा कसे याबाबतची खात्री करूनच डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनाचे अर्ज मंजूर / नामंजूर करावे.

३. डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनाचे अर्ज नामंजूर करतेवेळी स्पष्ट कारणांसह अर्ज नामंजूर करावे.

४. जर संस्थेतील विद्यार्थ्यांकडून एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनांकरीता अर्ज करण्यात आले असतील व संस्थास्तरांवरून एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जांना मंजुरी देण्यात आलेली असेल तर अशा अर्जांबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद .

प्रत : मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.